भारतीय रिझर्व्ह बँक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

आरबीआय/2019-20/246
डीओआर.डीआयआर.बीसी.क्र.73/04.02.002/2019-20 मे 23, 2020

सर्व अनुसूचित वाणिज्य बँका (आरआरबी वगळता)
सर्व प्राथमिक नागरी सहकारी बँका[1]
सर्व लघु वित्त बँका

महोदय/महोदया,

**माल पाठवण्यापूर्वीचे व माल पाठविल्यानंतरचे निर्यात कर्ज - अग्रिम राशींच्या कालावधीचा विस्तार/मुदतवाढ**

कृपया डीबीआर.क्र.डीआयआर.बीसी.14/04.02.002/2015-16 दि. जुलै 1, 2015 रोजी देण्यात आलेल्या, व 'रुपये/विदेशी मुद्रा निर्यात कर्ज व निर्यातदारांसाठीची ग्राहक सेवा' वरील महापरिपत्रकाचा व ह्याच विषयावरील इतर संबंधित परिपत्रकांचा संदर्भ घ्यावा.

2. कोविड-19 च्या देशव्यापी साथीचा विचार करता, निर्यातदारांना, ऑर्डरीमधील विलंब/पुढे ढकलल्या जाणे, बिले मिळण्यामधील विलंब इत्यादींसारख्या वास्तविक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. ह्या बाबत, जुलै 31, 2020 पर्यंत करण्यात आलेल्या निर्यातींबाबतची वसुली व प्रत्यावर्तन ह्यासाठीचा काल, निर्यातीच्या तारखेपासून नऊ महिन्यांपासून 15 महिन्यांपर्यंत वाढविण्यास आरबीआयने आधीच परवानगी दिली आहे. ह्या सवलतीला अनुसरुन, जुलै 31, 2020 पर्यंत केलेल्या वाटपासाठी बँकांनी मंजुर केलेला, माल पाठविण्यापूर्वीच्या व माल पाठविल्या नंतरच्या निर्यात कर्जांचा कमाल परवानगीप्राप्त कालावधी एक वर्षापासून, 15 महिन्यांपर्यंत वाढविण्याचे ठरविण्यात आले आहे.

आपला विश्वासु,

(डॉ एस. के. कार)
मुख्य महाव्यवस्थापक

----------------------
[1] एडी वर्ग 1 परवाना धारण करणा-या अनुसूचित बँक

विनियमन विभाग, केंद्रिय कार्यालय, 12 वा आणि 13वा मजला, केंद्रिय कार्यालय भवन, शहिद भगतसिंह मार्ग मुंबई 400001
टेलिफोन क्र : 22661602, 22601000 फॅक्स क्र. : 022-2270 5670, 2260 5671, 5691 2270, 2260 5692